# 2021-22

# 'फिटनेस का डोस आधा घंटा रोज'-प्रा.डॉ. दादासाहेब डेंगळे

## कै. रसिका महाविद्यालयात राज्यस्तरीय कार्यशाळा

देशोन्नती वृत्तसंकलन...

**देवणी** ■ निरोगी आरोग्यासाठी तसेच रोगप्रतिकारशक्ती वाढविण्यासाठी दररोज किमान अर्धा तास शास्त्रशुद्ध पद्धतीने व्यायाम करावा, असे आवाहन शारीरिक शिक्षण विभाग, पुणे विद्यापीठ येथील शारीरिक शिक्षण व क्रीडा विषयाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. दादासाहेब डेंगळे यांनी केले.

येथील कै. रसिका महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण व क्रीडा विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या व्हर्च्युअल राज्यस्तरीय कार्यशाळा 'फिटनेस का डोस आधा घंटा रोज' मध्ये प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. या व्हर्च्युअल राज्यस्तरीय कार्यशाळेचे अध्यक्ष संस्थाध्यक्ष गोविंदराव भोपणीकर होते तर कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत जावळे यांनी शुभेच्छा देऊन केले. प्रमुख पाहुणे म्हणून संस्था सचिव गजानन भोपणीकर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे



सूत्रसंचालन प्राणीशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. पुरुषोत्तम मोरे यांनी केले तर प्रमुख पाहुण्यांची ओळख प्रा. अंकुश भुसावळे यांनी करून दिली. उपस्थितांचे आभार शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग प्रमुख प्रा. डॉ सचिन चामले यांनी मानले. कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले. या ऑनलाइन कार्यशाळेस मोठ्या संख्येने विद्यार्थी, प्राध्यापक व नागरिक सहभागी होते.

# विघ्नहर्त्याचे आज आगमन, मंडळांसह घराघरात बाप्पाची प्रतिष्ठापना!

देशोन्नती वृत्तसंकलन...

**अकोला** ■ भारतीय समाजामध्ये एकी असावी या उद्देशाने बाळ गंगाधर टिळक यांनी या गणेश उत्सवाला

**आज गणेश चतुर्थी!!**



नामस्मरणाचे, आराधनेचे लवकर फळ मिळते, पूजेच्या वेळी, 'ओम गं गणपतये नमः' या मंत्राचा जप करताना गणेशाला पाणी, फुले, अक्षदा, चंदन आणि धूप-दीप तसेच


Janseva Sevabhavi Pratishthan,Bhopni's
Kai. Rasika Mahavidyalaya,Deoni
FIT INDIA
National Service Scheme
&
Department Of Physical Education & Sport
Jointly Organized
आझादी का अमृत महोत्सव
FIT INDIA FREEDOM RUN 2.0
Fit India Freedom Run 2.0
FITNESS KA DOZE ADHA GHANTA ROZ
FITNESS IS EASY
Organizing Committee
Dr.Sachin Chamle
Director of Physical Education
Dr.Gopal Somani
NSS Program Officer
Dr.Chandarkant Jawale
Principal

# कै. रसिका महाविद्यालयात फिट इंडिया फ्रीडम उपक्रम

देशोन्नती वृत्तसंकलन...

**देवणी** ■ भारतीय स्वातंत्र्याला पंचेहत्तर वर्ष पूर्ण झाल्याबद्दल मिनिस्ट्री ऑफ युथ अफेअर्स अँड स्पोर्टस मंत्रालयाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवानिमित्त कै. रसिका महाविद्यालयात 'फिट इंडिया फ्रीडम रन' हा उपक्रम घेण्यात आला आहे. 'फिट इंडिया फ्रीडम रन' अंतर्गत 'फिटनेस का डोज, आधा घंटा रोज' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत जावळे, क्रीडा संचालक डॉ. सचिन चामले, रासेयो

## भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवानिमित्त

कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. गोपाल सोमाणी यांच्यासह महाविद्यालयातील शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभाग नोंदविला. आठ दिवस हा उपक्रम घेऊन फिटनेस संबंधी विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेत्तर यांच्यामध्ये जागृती करण्यात येणार आहे. असे संयोजक क्रीडा संचालक डॉ. सचिन चामले, रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. गोपाल सोमाणी यांनी यावेळी सांगितले.



ePaper देशोन्नती
Tue, 05 October 2021
https://deshonnati.digitalec

# कै. रसिका महाविद्यालयाच्या खेळाडुंचे आंतर विभागीय योगा स्पर्धेत यश

देशोन्नती वृत्तसंकलन...

**देवणी** ■ स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत कै. बाबुराव पाटील महाविद्यालय, हिंगोली येथे सेंटर झोन विभाग योगा (पुरुष /महिला) स्पर्धा दि. १७' १८ डिसेंबर, २०२१ रोजी संपन्न झाल्या. या स्पर्धेत 'ब ' विभागाचे प्रतिनिधित्व करत कै.रसिका महाविद्यालयाच्या खेळाडूंनी यश संपादन केले आहे. या संघात सौरभ भोजने, राठोड सागर,पाशिमे अमर, सुरवसे राजरत्न, ठिगळे श्रीनाथ यांचा सहभाग होता. या खेळाडूंना क्रीडा

स्पर्धेत 'ब ' विभागाचे प्रतिनिधित्व करत कै. रसिका महाविद्यालयाच्या खेळाडूंनी यश संपादन केले आहे. या संघात सौरभ भोजने, राठोड सागर,पाशिमे अमर, सुरवसे राजरत्न, ठिगळे श्रीनाथ यांचा सहभाग होता.



संचालक डॉ. सचिन चामले यांनी मार्गदर्शन केले. या खेळाडूंचे संस्थेचे अध्यक्ष गोविंदराव भोपणीकर, सचिव गजानन भोपणीकर, प्राचार्य डॉ. चंद्रकांत जावळे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी अभिनंदन केले.

ePaper देशोन्नती
Tue, 21 December 2021
https://deshonnati.digitaledition.in/c/65094741

# कै. रसिका महाविद्यालयाच्या खेळाडुंची राज्यस्तरीय क्रॉस कंट्री स्पर्धेसाठी निवड

देशोन्नती वृत्तसंकलन...

**देवणी** महाराष्ट्र ॲथलेटिक असोसिएशनच्या, मुंबई द्वारा व सांगली असोशियन सांगली यांच्या संयुक्त विद्यमाने राजाराम महाविद्यालय, जत, जिल्हा सांगली येथे होणाऱ्या राज्यस्तरीय क्रॉसकंट्री स्पर्धेसाठी लातूर जिल्ह्याच्या संघात कै. रसिका महाविद्यालयाच्या चार खेळाडुंची निवड झाली आहे.



यात सोमनाथ बेंडले (बी.कॉम. द्वितीय वर्ष), गोंडगावे भागवत (बी. कॉम. प्रथम वर्ष), बिरादार आकाश (बी. कॉम. प्रथम वर्ष) धोत्रे मंगेश (बी.कॉम. प्रथम वर्ष) यांचा संघात समावेश आहे.

या खेळाडूंना क्रीडा संचालक डॉ. सचिन चामले यांनी मार्गदर्शन केले. खेळाडूच्या निवडीबद्दल संस्थेचे अध्यक्ष गोविंदराव भोपणीकर, सचिव गजानन भोपणीकर, प्राचार्य डॉ. चंद्रकांत जावळे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी या खेळाडुंचे अभिनंदन केले आहे.

ePaper देशोन्नती
Tue, 28 December 2021
https://deshonnati.digitaledition.in/c/65238325

पुढारी

# रसिका महाविद्यालयास क्रिकेट स्पर्धेत उपविजेतेपद



**देवणी, पुढारी वृत्तसेवा :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड अंतर्गत आंतर महाविद्यालयीन 'ब' विभाग क्रिकेट स्पर्धा पुरुष स्पर्धा दि. २७ ते २९ डिसेंबर, २०२१ रोजी महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर येथे झाले. या स्पर्धेत कै. रसिका महाविद्यालयाच्या पुरुष संघाने द्वितीय क्रमांक पटकावला आहे.

या संघात विशाल जाधव, अंकित जाधव, शेख आफ्ताब, सागर राठोड,अभिषेक पाटील, मॅकलवाढ गजानन, आकाश बिरादार, पवार यादव, कुलदीप तेलंगे, गौडंगावे भागवत, पासमे अमर, धोत्रे मंगेश, तानाजी चाफे, पवन चनाळे, वैभव सगर, अभिषेक केदासे यांचा समावेश होता. या खेळाडूंचा सत्कार महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. तांबोळी यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी डॉ. राजेश्वर पाटील, डॉ. सचिन चामले, प्रा. निहाल खान, प्रा. शिवानंद पाटील प्रा. सतीश मुंढे, रोहन एनाडले इत्यादी उपस्थित होते. खेळाडूंना क्रीडा संचालक डॉ. सचिन चामले यांनी मार्गदर्शन केले. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष गोविंदराव भोपणीकर, गजानन भोपणीकर, प्राचार्य डॉ. चंद्रकांत जावळे आदींनी अभिनंदन केले.

My Latur Edition
Dec 31, 2021 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

## मराठवाडा विद्यापीठ महाविद्यालयाचा संयुक्त उपक्रम

# कै.रसिका महाविद्यालयात 'ब' विभाग आंतरमहाविद्यालयीन वेटलिफ्टिंग स्पर्धा संपन्न

देशोन्नती वृत्तसंकलन...

**देवणी** ■ येथील कै. रसिका महाविद्यालय व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने 'ब' विभाग आंतर महाविद्यालयीन वेटलिफिटंग, पॉवरलिफ्टींग व बेस्ट फिजिक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये आठ महाविद्यालयांनी सहभाग घेतला. या स्पर्धेचे सर्वसाधारण विजेतेपद महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय उदगीर या महाविद्यालयाने पटकावले. या स्पर्धेचे उद्‌घाटन संस्थेचे सचिव गजानन भोपणीकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. या स्पर्धेचे उद्‌घाटन राजेश्वर पाटील ( माजी सिनेट सदस्य ) यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या स्पर्धेचे निवड समितीचे चेअरमन म्हणून डॉ. दिलीप भडके, सदस्य म्हणून प्रा. सतीश मुंडे यांनी काम पाहिले. स्पर्धेचे पंच म्हणून डॉ. शिवानंद पाटील, प्रा. दत्ता मुंडे, प्रा. रोहन एनाडले, सचिन चौधरी, विक्रम गायकवाड, प्रवीण होलसंबरे यांनी काम पाहिले. या स्पर्धेतील विविध वजन गटांमध्ये मोठ्या प्रमाणात खेळाडूंनी सहभाग घेतला. स्पर्धेतील विजेत्या खेळाडूंना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत जावळे यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. या स्पर्धेचे आयोजन क्रीडा संचालक डॉ. सचिन चामले यांनी केले. स्पर्धा संपन्न होण्यासाठी उपप्राचार्य डॉ. शिवाजी सोनटक्के, डॉ. विजयकुमार मोरे, डॉ. सुदर्शन पेडगे, प्रा. महादेव टेंकाळे, डॉ. वैशाली चटगे, डॉ. सुलोचना डेंगाळे डॉ. रेणुका कुनाळे, प्रा. अंकुश भुसावळे, प्रा. अंकुश भास्कर, डॉ. प्रशांत भंडे, डॉ.गोपाल सोमाणी, डॉ. योगेश मुळे, डॉ. सी. एम. मलबा, व्यंकट पांढरे, संतोष मुळे यांनी सहकार्य केले.



ePaper देशोन्नती
Wed, 15 December 2021
https://deshonnati.digitaledition.in/c/64974073

# कै.रसिका महाविद्यालयास आंतरमहाविद्यालयीन क्रिकेट स्पर्धेत उपविजेतेपद

देशोन्नती वृत्तसंकलन...

**देवणी** ■ स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड अंतर्गत आंतर महाविद्यालयीन 'ब' विभाग क्रिकेट स्पर्धा पुरुष स्पर्धा दि. २७ ते २९ डिसेंबर, २०२१ रोजी महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर येथे संपन्न झाल्या. या स्पर्धेत कै. रसिका महाविद्यालयाच्या पुरुष संघाने द्वितीय क्रमांक पटकावला आहे. या संघात विशाल जाधव, अंकित जाधव, शेख आफ्ताब, सागर राठोड,अभिषेक पाटील , मॅकलवाढ गजानन, आकाश बिरादार, पवार यादव ,कुलदीप तेलंगे , गौडगावे भागवत, पासमे अमर, धोत्रे मंगेश, तानाजी चाफे, पवन चनाळे, वैभव सगर, अभिषेक केदासे यांचा समावेश होता. या संघाने शिवाजी महाविद्यालय उदगीर या महाविद्यालयाच्या संघाचा उपांत्य फेरीत पराभव करून उपविजेतेपद पटकाविले. या खेळाडूंचा सत्कार महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. तांबोळी यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी डॉ.राजेश्वर पाटील, डॉ.सचिन चामले, प्रा.निहाल खान, प्रा.शिवानंद पाटील प्रा.सतीश मुंढे, रोहन एनाडले इत्यादी उपस्थित होते.

या खेळाडूंना क्रीडा संचालक डॉ. सचिन चामले यांनी मार्गदर्शन केले. खेळाडूंच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष गोविंदराव भोपणीकर, सचिव गजानन भोपणीकर, प्राचार्य डॉ.चंद्रकांत जावळे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी या खेळाडूंचे अभिनंदन केले आहे.



ePaper देशोन्नती Sat, 01 January 2022
https://deshonnati.digitaledition.in/c/65318466

देशोन्नती

# कै.रसिका महाविद्यालयाच्या खेळाडूंची राज्यस्तरीय ॲथलेटिक्स स्पर्धेसाठी निवड

देशोन्नती वृत्तसंकलन...

**देवणी** ▬ महाराष्ट्र ?थलेटिक्स असोसिएशनच्या, मुंबई द्वारा व पुणे जिल्हा असोशियशन यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २१ व २३ एप्रिल २०२२ रोजी संत ज्ञानेश्वरी क्रीडा संकुल, भोसरी येथे होणाऱ्या राज्यस्तरीय ॲथलेटिक्स स्पर्धेसाठी लातूर जिल्ह्याच्या संघात कै. रसिका महाविद्यालयाच्या दोन खेळाडूंची निवड झाली आहे. त्यात बिरादार आकाश (बी.कॉम. प्रथम वर्ष ) धोत्रे मंगेश (बी.कॉम. प्रथम वर्ष ) यांचा संघात समावेश आहे.



या खेळाडूंना क्रीडा संचालक डॉ. सचिन चामले यांनी मार्गदर्शन केले. खेळाडूच्या निवडीबद्दल संस्थेचे अध्यक्ष गोविंदराव भोपणीकर , सचिव गजानन भोपणीकर , प्राचार्य डॉ. चंद्रकांत जावळे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी या खेळाडूंचे अभिनंदन केले आहे.

Deshonnati Edition
Apr 30, 2022 Page No. 8
Powered by : eReleGo.com

देशोन्नती

# कै. रसिका महाविद्यालयाच्या अभिषेक केदासे या खेळाडुची कुमार गट राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेसाठी निवड

देशोन्नती वृत्तसंकलन...

**देवणी** महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या द्वारा व पुणे जिल्हा कबड्डी असोशियशन यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ५ ते ८ मे २०२२ रोजी ४८ वी कुमार गट राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा बालेवाडी येथे होणार आहे. या स्पर्धेसाठी लातूर जिल्ह्याच्या संघात कै. रसिका महाविद्यालयाच्या अभिषेक केदासे (बी. एस्सी. प्रथम वर्ष) या खेळाडुची निवड झाली आहे.

या खेळाडुचा सत्कार संस्था सचिव गजानन भोपणीकर यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत जावळे व उपप्राचार्य डॉ. शिवाजी सोनटक्के तसेच आबासाहेब इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या सुप्रिया कांबळे, क्रीडा संचालक डॉ. सचिन चामले उपस्थित होते. खेळाडू अभिषेक केदासे याने मिळवलेल्या यशाबद्दल महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी या खेळाडुचे अभिनंदन केले आहे.



Deshonnati Edition
May 7, 2022 Page No. 2
Powered by : eReleGo.com

देशोन्नती

# कै. रसिका महाविद्यालयात राज्यस्तरीय योग कार्यशाळा

देशोन्नती वृत्तसंकलन...

**देवणी** ▬ येथील कै. रसिका महाविद्यालयात दादा पाटील राजळे कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, आदिनाथनगर, जि. अहमदनगर व सी. एच. चौधरी कला, एस. जी पटेल वाणिज्य आणि बाबाजी ब. जे पटेल विज्ञान महाविद्यालय, तळोदा, जि. नंदुरबार यांच्या शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग यांच्यामध्ये झालेल्या सामंजस्य करारांतर्गत 'निरामय जीवनशैलीसाठी योगा' या विषयावर ऑनलाईन माध्यमातून एक दिवशीय राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यशाळेचे प्रास्ताविक प्रा. रोहित आदलिंग यांनी केले. आजच्या धावपळीच्या जीवनामध्ये आणि बैठ्या जीवनशैलीमुळे आपल्या आरोग्यावर याचे दुष्परिणाम होताना पाहायला मिळत आहेत. यामुळे आपल्याला निरामय जीवनशैली योगाद्वारे कशी प्राप्त करता येईल आणि योगा उत्तम आरोग्य राखण्यासाठी कशाप्रकारे उपयुक्त ठरू शकेल हा मुख्य उद्देश समोर ठेवून आजच्या कार्यशाळेचे आयोजन केल्याचे त्यांनी



सांगीतले. या नंतर डॉ. मेहबूब तांबोळी यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत केले व अशा प्रकारचे उपक्रम भविष्यात घेण्यात यावेत, असे मत त्यांनी व्यक्त केले. या नंतर कै. रसिका महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत जावळे यांनी कार्यशाळेसाठी शुभेच्छा दिल्या व सर्वांगीण विकासासाठी शारीरिक शिक्षण व योगा खूप महत्त्वाचे आहेत, असे त्यांनी आपल्या भाषणात म्हटले.

प्रथम सत्रात डॉ. रुपेश थोपटे यांनी योगाविषयी असलेल्या चुकीच्या समजुती यावर भाष्य केले. तसेच निरामय जीवनासाठी योग आणि प्राणायम आपल्याला कशी मदत करतात तसेच योग आपल्या शारीरिक व मानसिक विकासाठी कसा फायदेशीर आहे हे सांगीतले.

दुसऱ्या सत्रात डॉ. राजेंद्र मोरे यांनी अष्टांग योगाविषयी माहिती दिली. तसेच योगाचे फायदे काय आहेत हे त्यांनी आपल्या व्याख्यानात सांगितले. त्याचबरोबर विविध प्रकारचे प्राणायाम कसे करायचे याचे प्रात्यक्षिक देखील त्यांनी यावेळी दाखवले.

मान्यवरांचे आभार प्रा. प्रसाद भोगे यांनी मानले. डॉ. सचिन चामले यांनी राज्यस्तरीय कार्यशाळेचे सूत्रसंचालन केले. या कार्यशाळेमध्ये जवळपास १२४ विद्यार्थी, संशोधक शिक्षक व प्राध्यापक सहभागी झाले होते. कार्यशाळेचे आयोजन करण्यासाठी दादापाटील राजळे शिक्षण संस्थेचे अध्यक्ष

> सी.एच चौधरी कला, एस.जी पटेल वाणिज्य आणि बाबाजी ब.जे पटेल विज्ञान महाविद्यालयाचे डॉ. सुनील गोसावी यांनी धकाधकीच्या जीवनामध्ये मनावरील ताण कमी करण्यासाठी योगा खूप महत्त्वाचा आहे, असे सांगितले.

आप्पासाहेब राजळे, मोनिका राजळे, राहुल राजळे, सचिव जे. आर. पवार तसेच मविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष शिवाजी राजळे यांचे प्रोत्साहन लाभले.

कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. जे. टेमकर तसेच जनसेवा सेवाभावी प्रतिष्ठान संस्थेचे अध्यक्ष गोविंदराव भोपणीकर, संस्था सचिव गजानन भोपणीकर यांचे प्रोत्साहन लाभले. कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत जावळे व अध्यापक शिक्षण मंडळाचे अध्यक्ष भरत बबनराव माळी व उपाध्यक्ष सुधीर कुमार माळी, प्राचार्य डॉ . एस. आर मगरे यांनी मार्गदर्शन केले.

# कै.रसिका महाविद्यालयात राज्यस्तरीय योग कार्यशाळा संपन्न



देवणी (प्रतिनिधी): कै.रसिका महाविद्यालय, देवणी, दादापाटील राजळे कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, आदिनाथनगर जिल्हा-अहमदनगर व सी.एच चौधरी कला, एस.जी पटेल वाणिज्य आणि बाबाजी ब.जे पटेल विज्ञान महाविद्यालय, तळोदा, जिल्हा-नंदुरबार यांच्या शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग यांच्यामध्ये झालेल्या सामंजस्य करारा अंतर्गत 'निरामय जिवनशैलीसाठी योगा' या विषयावर ऑनलाईन माध्यमातून एक दिवशीय राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. कार्यशाळेचे प्रास्तावीक प्रा. रोहित आदलिंग यांनी केले.

आजच्या धावपळीच्या जीवनामध्ये आणि बैठ्या जीवनशैलीमुळे आपल्या आरोग्यावर याचे दुष्परिणाम होताना पाहायला मिळत आहेत. यामुळे आपल्याला निरामय जिवनशैली योगाद्वारे कशी प्राप्त करता येईल आणि योगा उत्तम आरोग्य राखण्यासाठी कशाप्रकारे उपयुक्त ठरू शकेल हा मुख्य उद्देश समोर ठेवून आजच्या कार्यशाळेचे आयोजन केल्याचे त्यांनी सांगितले. या नंतर डॉ. मेहबुब तांबोळी यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत केले व अशा प्रकारचे उपक्रम भविष्यात घेण्यात यावेत असे मत त्यांनी व्यक्त केले.या नंतर कै.रसिका महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत जावळे यांनी कार्यशाळेसाठी शुभेच्छा दिल्या व सर्वांगीण विकासासाठी शारीरिक शिक्षण व योगा खूप महत्त्वाचे आहेत असे त्यांनी आपल्या भाषणात म्हणले. श्री सी.एच चौधरी कला, एस.जी पटेल वाणिज्य आणि बाबाजी ब.जे पटेल विज्ञान महाविद्यालयाचे डॉ. सुनिल गोसावी यांनी धकाधकीच्या जीवनामध्ये मनावरील ताण कमी करण्यासाठी योगा खूप महत्त्वाचा आहे असे सांगितले.

प्रथम सत्रात डॉ. रुपेश थोपटे सरांनी योगा विषयी असलेल्या चुकीच्या समजुती यावर भाष्य केले. तसेच निरामय जीवनासाठी योग आणि प्राणायम आपल्याला कशी मदत करतात तसेच योग आपल्या शारीरिक व मानसिक विकासाठी कसा फायदेशीर आहे हे सांगीतले. दुसर्या सत्रात डॉ. राजेंद्र मोरे यांनी अष्टांग योगा विषयी माहिती दिली, तसेच योगाचे फायदे काय आहेत हे त्यांनी आपल्या व्याख्यानात सांगितले. त्याचबरोबर विविध प्रकारचे प्राणायाम कसे करायचे याचे प्रात्यक्षिक देखील त्यांनी यावेळी दाखवले.

मान्यवरांचे आभार प्रा. प्रसाद भोगे यांनी मानले डॉ. सचिन चामले यांनी राज्यस्तरीय कार्यशाळेचे सुत्रसंचालन केले. या कार्यशाळेमध्ये जवळपास १२४ विद्यार्थी, संशोधक शिक्षक व प्राध्यापक सहभागी झाले होते. कार्यशाळेचे आयोजन करण्यासाती दादापाटील राजळे शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. आप्पासाहेब राजळे, मा आ.श्रीमती मोनिकाताई राजीवजी राजळे, मा. श्री. राहुल राजळे, सचिव मा. श्री. जे. आर. पवार तसेच मविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष मा.श्री.शिवाजी राजळे यांचे प्रोत्साहन लाभले. कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी महाविद्यालयचे प्राचार्य डॉ. आर.जे. टेमकर तसेच जनसेवा सेवाभावी प्रतिष्ठान संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. गोविंदरावजी भोपणीकर साहेब, संस्था सचिव मा. श्री. गजाननजी भोपणीकरच साहेब यांचे प्रोत्साहन लाभले. कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी महाविद्यालयचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत जावळे व अध्यापक शिक्षण मंडळाचे अध्यक्ष मा.श्री. भरत बबनराव माळी व उपाध्यक्ष मा.श्री. सुधीर कुमार माळी यांचे प्रोत्साहन लाभले. कार्यक्रम यशस्वी पार पाडनण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ . एस. आर मगरे यांनी मार्गदर्शन केले.